नाशिक
दि. १०/०७/२०२०

# प्रेसनोट

**आलोसे भाऊसाहेब तुकाराम चव्हाण, उप शिक्षण अधिकारी, वर्ग—२, (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नाशिक, जि.नाशिक यांना ६,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक यांची कारवाई.**

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही चालु आहे. |
| कलम | लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ (संशोधन सन २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | भाऊसाहेब तुकाराम चव्हाण, उप शिक्षण अधिकारी, वर्ग—२, (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नाशिक, जि.नाशिक |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | १५,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ६,०००/— रुपये तडजोडी अंती |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची पत्नी जि.प.उर्दु प्राथमिक शाळा चांदवड, जि.नाशिक येथे प्राथमिक शिक्षिका म्हणून नेमणुकीस असतांना सदर कालावधी दरम्यान आलोसे भाऊसाहेब तुकाराम चव्हाण, उप शिक्षण अधिकारी, वर्ग—२, (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नाशिक कार्यालय, हे गटशिक्षण अधिकारी या पदावर कार्यरत होते.<br>तक्रारदार यांचे पत्नीची सुधारीत वेतन निश्चिती होवून सुध्दा डिसेंबर २०१९ पासून तिला वेतन मिळालेले नाही. त्याबाबत तक्रारदार यांनी खात्री केली असता त्यांच्या पत्नीचे सेवापुस्तकामध्ये घेतलेल्या नोंदीवर तत्कालीन गटशिक्षण अधिकारी भाऊसाहेब तुकाराम चव्हाण यांची स्वाक्षरी नसल्याने वेतन काढलेले नाही, म्हणून आलोसे भाऊसाहेब तुकाराम चव्हाण, उप शिक्षण अधिकारी, (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नाशिक कार्यालय यांनी तक्रारदार यांच्या पत्नीचे सेवापुस्तकाच्या सदर कालावधीतील घेतलेल्या नोंदीवर सही करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १५,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने दि. १०/०७/२०२० रोजी पडताळणी करुन सापळा आयोजित केला असता आलोसे भाऊसाहेब तुकाराम चव्हाण, उप शिक्षण अधिकारी, वर्ग—२, (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नाशिक कार्यालय, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडून १५,०००/— रूपये लाचेची मागणी केली व तडजोडी अंती पंच साक्षीदारांसमक्ष ६,०००/— रूपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम शिक्षण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद नाशिक येथे स्विकारल्याने त्यांना पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

( विजय जाधव )
पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो
नाशिक परिक्षेत्र, नाशिक